OC

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन ,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाई

झो.पु.प्रा निश्चयेन परिवर्तनम्। झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/भोप्र/२६६१/२०२४ दि. २५/०९/२०२४.

## सुधारित अंतिम भोगवटा प्रमाणपत्र (शुद्धिपत्रक)

वाचा - १) मूळ बांधकाम मंजुरी CC/००१९/०८ दि.१३/०६/२००८.

२) सुधारित बांधकाम मंजुरी CC/१११७/१४ दि.२६/०४/२०१४.

३) भोगवटा प्रमाणपत्र क्र. झोपुप्रा/तां ३/प्र.क्र.२५/११४४/२०१५ दि. २२/०७/२०१५.

४) अंतिम भोगवटा प्रमाणपत्र क्र. झोपुप्रा/तां १/प्र.क्र.२५/१४९४/२०१५ दि.१६/०९/२०१५.

५) या कार्यालयाची As Built plans ला मंजुरी दि.३०/०८/२०२४.

६) मे. सह्याद्री हॉस्पिटल यांचा दि.३०/०८/२०२४ रोजीचे मंजुरी प्रमाणे इमारतीस भोगवटा मिळणेकरिता प्रस्ताव अर्ज दि.२०/०९/२०२४.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे भांबुर्डा टी. पी. स्कीम, फायनल प्लॉट क्र. २८, सि. स. नं. १७१७, १७१९ ते १७२२, भैय्यावाडी, शिवाजीनगर, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस वाचा क्र.४ नुसार अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेत आले आहे. आता मे. सह्याद्री हॉस्पिटल यांनी योजनेतील मुक्त विक्री घटक इमारतीमध्ये किरकोळ अंतर्गत बदल करून सुधारित बांधकाम परवानगी अपेक्षिलेली असता, सदर इमारतीस वाचा मधील क्र.५ अन्वये या कार्यालयाकडून क्र.झोपुप्रा/नगररचना/२११६ /२०२४, दि. ३०/०८/२०२४ अन्वये As built plan (Record Plans) ला मंजुरी देणेत आली आहे. सदरील मंजुरी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील हॉस्पिटल साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत सह्याद्री हॉस्पिटल यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केले आहे. वाचा क्र.५ च्या मंजुरीनुसार योजनेस सुधारित अंतिम भोगवटा प्रमाणपत्र (शुद्धिपत्रक) अदा करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक

नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करावे.

Slum Rehabilitation Authority ★ Pune-Pimpri-Chinchwad Area ★ Technical Department APPROVED

सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

२५/०८ 25/09

प्रत :- १. सह्याद्री हॉस्पिटल प्रा. लि., प्लॉट क्र. ५४, सर्वे क्र. ८९,९०, लोकमान्य कॉलनी, कोथरूड, पुणे Copy Received 25/09/24

२. ओंकार असोसिएट्स, २, तृप्ती अपार्टमेंट, हॉटेल रणजीत समोर, भांडारकर रोड, पुणे